# कुलाबा-वांद्रे-सीप्झ, मेट्रो मार्ग ३

मेट्रो ३ मार्गावरील वर्ली स्थानक येथे रौप्यमहोत्सवी ब्रेकथ्रू

***मुंबई, २९ जानेवारी २०२०*** - वाहतुकीच्या दृष्टीने कुलाबा-वांद्रे-सीप्झ हा मेट्रो मार्ग ३ हा महत्त्वाचा प्रकल्प आहे. यामुळे मुंबईकरांच्या रोजच्या प्रवासाच्या समस्या सुटतील. हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत, असे प्रतिपादन मा. पर्यटन व पर्यावरण मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांनी केले. मेट्रो ३ च्या भुयारीकरणाचा २५ व्या टप्पा आज वरळी येथे पार पडला, त्या निमित्याने आयोजित कार्यक्रमास ते उपस्थित होते.

एकूण ७ पॅकेज असलेल्या या मार्गातील पॅकेज-३ चा हा आजचा हा भुयारीकरणाचा पहिलाच टप्पा होता. मेट्रो -३ मार्गिकेतील पॅकेज -३ हे सर्वात लांब पॅकेज असून या अंतर्गत मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक व वरळी या स्थानकांचा समावेश आहे.

पॅकेज-३ चे टनेल बोअरिंग मशीन 'तानसा-१' सायन्स म्युझियमच्या उत्तर दिशेपासून दिनांक २७ सप्टेंबर २०१८ रोजी कार्यान्वित झाले. अनेक भौगोलिक आव्हानांना सामोरे जाऊन 'अप लाईन' बोगद्याचे २०७३ मीटर भुयारीकरण पूर्ण केले. या भुयारीकरणासाठी १३८१ सेगमेंट रिंग्सचा वापर करण्यात आला.

मेट्रो -३ मार्गिकेवरील प्रगतीपथावर असल्याचे बघून आनंद वाटला. प्रकल्पाचे आतापर्यंत जवळपास ७८% भुयारीकरण व ५०% हुन अधिक बांधकाम पूर्ण झाले आहे. मला खात्री आहे की, एमएमआरसी याच उत्साहाने व गतीने प्रकल्पाचे काम सुरू ठेवेल, असेही श्री ठाकरे म्हणाले.

एकूण १७ टीबीएम सध्या ३३.५ किमी लांब मार्गिकेवर कार्यरत आहेत. याविषयी बोलताना मुं.मे.रे.कॉचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रणजीत सिंह देओल म्हणाले, "प्रकल्पाचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठल्याचा मला आनंद आहे. आमच्या अभियंत्यांच्या व तज्ज्ञांच्या टीमने हे आव्हानात्मक काम अगदी सुलभरित्या पार पाडले आहे." आतापर्यंत उपनगरीय रेल्वेद्वारे न जोडली गेलेली मुख्य व्यापारी केंद्र पॅकेज-३ द्वारे जोडली जाणार आहेत. मेट्रो-३ कार्यान्वित झाल्यावर या भागात नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी नवसंजीवनी ठरेल, असेही श्री देओल म्हणाले.

**Rajesh Konduparti**
**+91 8469834515**
Rajesh.konduparti@perceptindia.in